



अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड








www.surajyadigital.com । शनिवार, दि. २१ सप्टेंबर २०२४ । ▶ वर्ष : २२ वे ▶ अंक : ३५२ वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८


## बेपत्ता महिला डॉक्टरची भानगड...

# औषध कंपनीला घातला लाखोंचा 'गंडा' बेडीच्या भीतीने शोधला पसार होण्याचा 'फंडा'

✔ सोलापूर/प्रतिनिधी

देवदर्शनाला गेलेली महिला डॉक्टर अचानक बेपत्ता झाली, आठवडाभराची ही न्यूज ऐकून सोलापूरच्या नारीशक्तीमध्ये एकच खळबळ उडाली. तिच्या पतीराजांनी आपली बायको बेपत्ता झाल्याची फिर्याद पोलीस ठाण्यातही दिली. नातेवाईकांकडे आणि सर्वत्र हुडकाहुडकी झाली पण ती बिचारी अजूनही सापडलेली नाही. पण तिची एक वेगळीच भानगड उजेडात आली.सोलापुरातील एका औषध कंपनीला तिने लाखो रूपयांचा गंडा घातला आणि हे पितळ उघडे पडल्यानंतर तिने पसार होण्याचा प्लॅन रचला. पोलीस तिच्या मागावर आहेत.



याबाबत पोलीस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की, एमआयडीसी पोलीस ठाण्यात रथशाला ही एक औषध कंपनी आहे.तिथे ही महिला डॉक्टर सेवेत होती. कंपनीच्या व्यवस्थापनाला अंधारात ठेवून तिने लाखो रूपयांची फसवणूक केली.याप्रकरणी कंपनीने तिच्याविरूध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. विजापूर नाका पोलिस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या या महिला डॉक्टरवर गुन्हा दाखल झाला. त्या महिला डॉक्टरा विरूध्द लाखो रूपयाची फसवणूक केल्याप्रकरणी दि. १३ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल झाला. ही खबर लागताच दि. १६ सप्टेंबर रोजी त्या महिला डॉक्टराच्या पतीने फौजदार चावडी पोलीस ठाण्यात डॉक्टर पत्नी बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केल्याचा संशय पोलिसांना लागून आहे. सिध्देश्वर मंदिरात देवदर्शन करून येते, तुम्ही घरी चला असे सांगून ती डॉक्टर महिला बेपत्ता झाल्याची तक्रार महिला डॉक्टरच्या पतीने फौजदार चावडी पोलिस ठाण्यात दाखल केली. सध्या त्या महिला डॉक्टरचा तपास एमआयडीसी पोलीस व फौजदार चावडी पोलीस करित आहेत. एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील रथशाला औषध कंपनीत ती महिला डॉक्टर कामाला होती. त्या औषध कंपनीत तिने लाखो रूपयाची फसवणूक केल्याची फिर्याद एमआयडीसी पोलिस ठाण्यात दाखल झाली होती. त्या फिर्यादी वरून या म्हटले होते की, सिध्देश्वर मंदिरात सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास तक्रारदार पती हे सिध्देश्वर मंदिरात दर्शन घेण्यासाठी गेले त्यावेळी तेथे त्यांची पत्नी महिला डॉक्टर हिची भेट झाली. यावेळी तिने मी देवदर्शन करून येते, तुम्ही घरी चला असे सांगितले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी पर्यंत ती न आल्याने व तिचे नातेवाईक तसेच एसटी स्टँड व रेल्वे स्टेशन येथे तिचा शोध घेतला. पण...ती मिळून आली नाही.

ती महिला डॉक्टर एमआयडीसी येथील रथशाला औषध कंपनीत कामाला असताना तिच्या विरूध्द लाखो रूपयाची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. आम्ही तिच्या शोधात आहोत, असे फसवणुकीच्या गुन्ह्याचा तपास करणाऱ्या सहायय्क पोलीस निरीक्षक निलम घोरपडे यांनी सांगितले.

## पुढच्या महिन्यात पुणे-सोलापूर विमानसेवेचा श्रीगणेशा



✔ सोलापूर/प्रतिनिधी

सोलापूरच्या होटगी रोडवरील विमानतळावरून विमानसेवा सुरू करण्याचा मुहूर्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ठरवला गेल्यानंतर जिल्हा प्रशासन आणि केंद्रीय विमानतळ प्राधीकरण यांच्याकडून सोलापूरहून विमाने कुठे कुठे सुरू करायची याबाबत जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत. पुढच्या महिन्यात पहिली पुण्याला विमानसेवा सुरू करण्याचे निश्चित झाल्याचे वृत्त आहे.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली सोलापूरच्या विमानसेवेबाबत जिल्हा प्रशासन आणि विमानतळ प्राधीकरण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बुधवारी बैठक झाली. त्यात सोलापूरची विमानसेवा तातडीने सुरू करण्याची सूचना मोहोळ यांनी प्राधीकरणाला दिली. त्यानंतर गुरूवार दि.२६ सप्टेंबर रोजी मोदी यांच्या हस्ते विमानसेवेचा शुभारंभ करण्याचे निश्चित करण्यात आले.

त्यानंतर शुक्रवारी जिल्हा प्रशासन आणि विमानतळ प्राधीकरण सुरक्षा समितीमधील ४ सदस्य यांची बैठक झाली.या समितीने विमानतळाची पहाणी केली.येत्या दोन दिवसात या पहाणीचा अहवाल प्राधीकरणाला दिला जाईल. त्यानंतर विमानसेवा सुरू करण्याचा परवाना दिला जाईल.त्यामुळे मोदींच्या हस्ते विमानसेवेचा आरंभ करण्याचा मार्ग मोकळा होईल.

### कुठे कुठे सेवा सुरू करणार

ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात प्रत्यक्षात विमानसेवेला सुरूवात होईल.पहिला श्रीगणेशा म्हणून पुणे-सोलापूर-पुणे अशी विमानसेवा सुरू केली जाईल.सोलापूर मुंबईचा विचार सुरू आहे पण मुंबईतील विमानतळावर जागा उपलब्ध होण्याचा प्रश्न आहे. त्यामुळे स्वतः मंत्री मुरलीधर मोहोळ आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे या प्रश्नात लक्ष घालून मार्ग काढतील.त्यानंतर मुंबईचाही मार्ग मोकळा होईल.सोलापूर- तिरूपती,सोलापूर-तिरूपती आणि सोलापूर-बंगळुरू,असे तीन सेवांचे पर्याय आहेत. ह्या सेवा डिसेंबर किंवा जानेवारीत सुरू होतील,असे सांगण्यात आले.२६ सप्टेंबरला देशातील ८ ठिकाणच्या विमानसेवेचा शुभारंभ केला जाणार आहे.त्यात सोलापूरचाही समावेश आहे.

## सातरस्ता परिसरात डंपरच्या धडकेने दुचाकीवरील वृध्द जागीच ठार

▶▶ जड वाहतुकीचा आणखी एक बळी
▶▶ संतप्त जमावाने डंपर फोडला

✔ सोलापूर/प्रतिनिधी

रंगभवन चौकाकडून सातरस्ता चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर नानानानी पार्क जवळ एका भरधाव वेगाने येणाऱ्या डंपरने दुचाकिस्वारास धडक दिल्याने बाळासाहेब विश्वनाथराव कुलकर्णी (वय ८३) रा.जेऊर, ता. अक्कलकोट हे जागीच ठार झाले.हा अपघात शुक्रवारी दुपारी साडे तीन वाजता घडला. यावेळी त्या रस्त्यावर वाहतुकींची कोंडी झाली होती. यावेळी रस्त्यावरील रक्ताचा सडा पाहुन संतप्त झालेल्या लोकांनी डंपरवर दगडफेक करून डंपरच्या काचा फोडल्या.

घटनास्थळी पोलीस वेळीच आले आणि त्यांनी मृतदेह शासकीय रूग्णालयात पाठवून दिला. घटनास्थळी आलेल्या अग्निशामक दलाच्या जवानांनी पोलिसांच्या मदतीने रस्त्यावरील रक्ताचा सडा धुवून काढला. व वाहतूक सुरळीत केली. सदर



बजार पोलिसांनी डंपर चालक आरोपी फरीद नसीर शेख (वय ३५ रा. उळेवाडी, उत्तर सोलापूर) याला ताब्यात घेतले. कुलकर्णी हे दि. २० सप्टेंबर रोजी जेऊरवरून बँकेच्या कामासाठी सोलापुरात आले होते. दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास ते एमएच १३/सीडब्ल्यू ३७६९ या क्रमांकाच्या मोटारसायकलवर सातरस्त्याकडे निघाले होते. ते सातरस्ता येथील नाना-नानी पार्क जवळून निघाले होते. त्यावेळी पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या वाळूच्या एमएच १३/डीक्यू ६८५६ या क्रमांकाच्या डंपरने त्यांना धडक दिली. या अपघातात डंपरचे चाक अंगावरून गेल्याने त्यांच्या शरिराचा चेंदामेंदा झाला.रस्त्यावर रक्ताचा सडा पडलेला होता. यावेळी अपघात झाल्यानंतर त्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतुकींची कोंडी झाली होती. यावेळी रस्त्यावरील रक्ताचा सडा पाहून उपस्थित संतप्त झालेल्या लोकांनी डंपरवर दगडफेक करून डंपरच्या काचा फोडल्या.

या रस्त्यावर वाहतुकीची मोठी कोंडी होत असते. अपघात ठिकाणी जवळच चहाचे कॅन्टीन आहेत. व आईस्क्रिम पार्लर आणि वडापावचे दुकान आहे. नागरीक आपली वाहने रोडवरच पार्क करित असल्याने येणाऱ्या-जाणाऱ्या वाहन धारकांना जीव मुठीत धरूनच वाहने चालवावी लागतात. त्यामुळे या रोडवर रोजच वाहतुकींची कोंडी होते. आता पुन्हा एकदा जडवाहतुकीचा बळी गेल्यामुळे आता तरी शहर वाहतूक शाखा किंवा महानगर पालिकेच्या अतिक्रमण पथकाला जाग येते का ? याची शहरवासी प्रतिक्षा करित आहेत. मृत बाळासाहेब कुलकर्णी यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना व नातवंडे असा परिवार आहे. ते केंद्र सरकारच्या नॅशनल सॅम्पल सर्वे विभागात वरिष्ठ अधिकारी म्हणून सेवानिवृत्त झाले होते.

## इंचगाव येथे कुऱ्हाडीने वार करून एकाचा खून

✔ मोहोळ : मोहोळ तालुक्यातील इंचगाव येथे कुऱ्हाडीचे वार करून एकाचा निर्घृन खून करण्यात आला. ही घटना दुपारी दोनच्या सुमारास घडली. खुनाचे नेमके कारण समजू शकले नाही. दत्तात्रय वामन वराडे (वय ५१) असे खून झालेल्याचे नाव आहे. इंचगाव येथील बंदेनवाज दर्गाजवळ सिमेंट कोब्यावर दत्तात्रय हे बसलेले होते. त्यांच्यावर विजय नागनाथ घुले याने कुऱ्हाडीने सपासप वार करुन ठार मारले. संशयीत आरोपी विजय नागनाथ घुले याला अटक करण्यात आली आहे. मयताचा भाऊ नागनाथ वामन वराडे यांनी कामती पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद दिली आहे.

## सोलापूरच्या किर्ती भराडियाने रचला इतिहास

### १० तास २५ मिनिटे समुद्रात पोहून पार केले भारत-श्रीलंका अंतर

✔ सोलापूर : सोलापूर शहरात राहणारी किर्ती नंदकिशोर भराडिया (वय १८) हिने श्रीलंका ते भारत हे ३२ किलोमीअरचे अंतर समुद्रात न थांबता १० तास २५ मिनिट पोहून पूर्ण केले. यावेळी किर्तीने श्रीलंकेतील तलाईमनार येथील समुद्रात झेप घेत अनंत अडचणींचा सामना करीत ऐतिहासिक कामगिरी पूर्ण केली. या ऐतिहासिक क्षणाला वर्ल्ड रेकॉर्ड कम्युनिटीचे उच्च अधिकारी उपस्थित होते. त्यांनी कीर्तीला विश्व विक्रमाचे प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले.

किर्ती भराडियाचे १९ सप्टेंबरला कीर्तीचे फिटनेस तपसण्यात आले आणि त्यादिवशी दुपारी १ वाजता रामेश्वर येथून किर्ती बोटिने श्रीलंकेसाठी रवाना झाली. किर्ती सोबत



मुंबई : कीर्तीला विश्व विक्रमाचे प्रमाणपत्र देऊन सन्मानित करताना वर्ल्ड रेकॉर्ड कम्युनिटीचे उच्च अधिकारी.

तिच्या प्रशिक्षिका रुपाली रेपाळे, अनिरुध्द महाडिक, वडील नंदकिशोर, काका द्वारकादास, भाऊ अविनाश व रेस्क्यू टीमचे १५ जण असे एकूण २० जण व इंडीयन नेव्हींचे जवान होते. श्रीलंका हद्दीत तेथील नेव्ही ने किर्तीचे स्वागत केले व पूर्ण सहकार्य केले. सर्वजण सायं ६ वाजता श्रीलंकेतील तलाईमनार येथील समुद्रकिनारी पोहोचले. २० सप्टेंबरच्या पहाटे १.४५ वाजता कीर्तीने समुद्रात झेप घेतली. रात्रीच्या काळोख्या अंधारात किर्ती कशाची सुद्धा तमा न बाळगता फक्त हात पाय मारत होती.

## युवकाची विष पिऊन आत्महत्या

✔ मोहोळ : मोहोळ तालुक्यातील विरवडे बु येथील युवकाने राहत्या घरात विष पिऊन आत्महत्या केली. राज नानासाहेब आवताडे (वय २७) असे त्या युवकाचे नाव आहे. त्याला सोलापूर येथील शासकिय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते, मात्र उपचारा दरम्यान त्याचा मृत्यू झाला. त्याच्या पश्चात आई वडील, भाऊ, विवाहित बहिणी, असा परिवार आहे.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



मी बायको असून मला तुमचं काही कळत नाही, जनता काय ओळखणार?

| कल्याण |
|---|
| 245-13-148 |

| मुंबई |
|---|
| 446-48-369 |

# पवारांनी मुख्यमंत्र्यांना अडवून दाखवावे, महिला उत्तर देतील

**● अमोल शिंदेंनी उडवली खिल्ली ● न कळत टीका केल्याने काँग्रेसच्या नेत्यांनी शिंदेंना घेतले फैलावर**

✔ सोलापूर/प्रतिनिधी

**लाडकी बहीण योजनेच्या कार्यक्रमासाठी येणाऱ्या मुख्यमंत्र्यांना माऊली पवार यांनी हिंमत असले तर अडवून दाखवावे, ते गर्दीत कधी गेले नाहीत. गर्दीची त्यांना कल्पना नाही. महिलाच त्यांना उत्तर देतील, असे म्हणत मराठा क्रांती मोर्चाचे अमोल शिंदे यांनी पवार यांची खिल्ली उडवली. यावेळी शिंदे यांनी न कळत काँग्रेस पक्षाच्या नेत्यांवरही टीका केली. या टीकेनंतर काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक विनोद भोसले आणि युवक काँग्रेसचे अध्यक्ष गणेश डोंगरे यांनी त्यांना फैलावर घेतले.**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे - पाटील हे काही दिवसापासून उपोषण करत असून त्यांची प्रकृती ढासळत आहे. शासनाने त्यांच्या या आंदोलनाची तात्काळ दखल घ्यावी अन्यथा लाडकी बहीण योजनेंतर्गत महिला भगिनींच्या भेटीसाठी येणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सोलापुरात पाय ठेवून दिले जाणार नाही,असा इशारा सकल मराठा समाजाचे समन्वयक माऊली पवार आणि



अमोल शिंदे माऊली पवार

त्यांच्या सहकाऱ्यांनी दिला होता. याला शुक्रवारी मराठा क्रांती मोर्चाचे अमोल शिंदे यांनी उत्तर दिले.

अमोल शिंदे म्हणाले, पवार आणि मराठा समाजाचे काही कार्यकर्ते काँग्रेस पुढाऱ्यांच्या पाठिंब्याने महाआघाडीचा अजेंडा राबवत आहेत. त्यांनी विरोधी पक्षाच्या खासदार प्राणिती शिंदे यांच्याकडून लेखी लिहून आणावे की,मराठ्यांना ओबीसीमधून आरक्षण द्यावे.असे आव्हान शिंदे यांनी पवार यांना दिले. महिलांच्या कार्यक्रमासाठी येत असलेल्या कार्यक्रमास मुख्यमंत्र्यांना कोणी अडवण्याची भाषा करत असेल तर महिला भगिनी हे सहन करणार नाहीत. माऊली पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना अडवूनच दाखवावे. ते गर्दीत कधी गेले नाहीत. गर्दीची त्यांना कल्पना नाही. महिलाच त्यांना उत्तर देतील. आम्ही कार्यकर्ते ही सज्ज आहोत, असे आव्हान शिंदे यांनी दिले.

भाजपच्या आजी-माजी पालकमंत्र्यांकडून काम करून घेणे या उद्योगासाठी पवार यांची स्टंटबाजी सुरू असते. जरांगे - पाटील यांचे नाव घेऊन काही जणांची दुकानदारी सुरू आहे, असा आरोपही शिंदे यांनी केला. या पत्रकार परिषदेस दास शेळके, दिलीप कोल्हे, अनंत जाधव, शशी थोरात आदी उपस्थित होते.

### दूध का दूध आणि पानी का पानी होऊ द्या : अमोल शिंदे

माऊली पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना अडवूनच दाखवावे. महिलाच त्यांना उत्तर देतील. घोषणा करायच्या आणि अटक करून घ्यायची असा या मागचा प्रसिद्धी स्टंट करण्याचा हेतू आहे. पोलिसांनी संबंधितांना ताब्यात घेऊ नये. मोकळे ठेवावे. जेणेकरून दूध का दूध आणि पानी का पानी होईल, असे आव्हान अमोल शिंदे यांनी पवार यांना दिले.

### अमोल शिंदे यांची भूमिका हास्यास्पद : भोसले



अमोल शिंदे यांनी न कळत काँग्रेसवर टीका केल्यानंतर माजी नगरसेवक विनोद भोसले यांनी त्यांना झापले आहे. आमच्या नेत्या खासदार प्राणिती शिंदे यांनी लोकसभेत आपल्या पहिल्याच भाषणात मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांचा उल्लेख करून त्यांचे उपोषण सरकारने तत्काळ थांबवले पाहिजे असे निक्षूण सांगितले आहे. त्यानंतरही प्राणिती शिंदे यांच्या कडून लेखी लिहून आणावे ही अमोल शिंदे यांची भूमिका मुळात हास्यस्पद आहे. सरकार महायुतीचे असताना हा प्रश्न लवकर सोडवण्यासाठी पाठपुरावा करायचा सोडून अश्या प्रकारची मागणी करणे म्हणजे राजकारण करणे असा आहे, असे विनोद भोसले यांनी म्हटले आहे. आम्हाला खेद होतो कारण आज जे आपण राजकारण आत आहात त्याचा श्रीगणेशा सुशीलकुमार शिंदे आणि प्रणिती शिंदे यांच्या आशीर्वादाने झाला आहे. हे आपण विसरता कामा नये, असेही भोसले यांनी म्हटले आहे.

### मराठा आंदोलकांना डिवचू नका : डोंगरे



प्रणिती शिंदे यांच्यावर टीका केल्यानंतर युवक काँग्रेसचे अध्यक्ष गणेश डोंगरे यांनीही या प्रकरणात उडली घेतली. अमोल शिंदे आपण सुद्धा एक काळ काँग्रेसमधील पिलावाळ होता हे मात्र विसरू नका. आपण महायुतीतील चार पिलावळ घेऊन मराठा समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करू नका.आपण जे काय आज राजकारणात, समाजकारणात आहात ते फक्त सुशिलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे कुटुंबियांमुळे आहात. आपण मराठा आंदोलकाला डिवचू नका. तुमच्यात हिम्मत असेल तर मुख्यमंत्री दोऱ्यात पोलीस प्रशासनाला सांगून मोकळे सोडवून दाखवाच तेव्हा संपूर्ण महाराष्ट्राला मराठा आंदोलक काय असतात ते कळेल, असे गणेश डोंगरे यांनी म्हटले आहे.